
अद्‌भुत

# जादुई नगरी

श्याम कुरळे / सरोज चौगुले



परी प्रकाशन

अद्भुत जादुई नगरी

© सुरक्षित

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

किंमत :
रुपये १३०/-

# अनुक्रमणिका

१. जादूची छडी ................. ३
२. जादूची बाहुली ............... ८
३. चंदूचा चंद्रलोक ............... १३
४. जादूचा आरसा ................ १८
५. जादूगार शुभंकर .............. २२
६. अपरिचित ...................... २७
७. सोनेरी पाखरू ................. ३१
८. जादू आहे एक कला ........... ३५
९. गाणारे झाड .................... ४०
१०. उडती छत्री ..................... ४४
११. जग्गूचे अपहरण ............... ४८
१२. हरी कुंभाराचा झाडू ............ ५२
१३. जादूची थाळी .................. ५७
१४. मंतरलेलं पाणी ................ ६१
१५. जादूगार राणी ................. ६६
१६. रेनकोटचा पाऊस .............. ७१
१७. जादूची बासरी ................ ७५
१८. जादूगार हिमानी .............. ८०
१९. गोप्याची टोपी ................ ८४
२०. नागर होले ..................... ८९
२१. माकडवाल्याची फक्कड जादू .. ९३
२२. जादूचा कर्मराक्षस .............. ११२
२३. कहाणी काळ्या जादूची ....... १३१
२४. जलदेवता आणि जादूच्या... ... १५०
२५. जादूचे अस्वल ................ १६९
२६. खाशी खोड मोडली ............ १७९

++



# जादूची छडी

– सरोज चौगुले

''आई ऽ, माझा डबा ऽ ? आणि पाण्याची बाटली पण दे ऽ''

''टेबलावर आहे. आत येऊन घे ऽ''

''हं ! अगं माझे मोजे कुठे आहेत ?''

''मला काय माहीत ?''

''असं काय करतेस ? अजून माझ्या शूजना पॉलिश करायचंय!''

''मग करून घे.''

''अगं, मला उशीर होतोय.''

''मग मी काय करू ? सकाळी लवकर उठावं जरा. आपल्या वस्तू जागच्या जागी ठेवायला शिकावं ना !''

आईच्या या बोलण्यावर संतापून अमर धाप् धाप् पाय आपटत स्वयंपाकघरात गेला. डबा, पाण्याची बाटली घेऊन दप्तरात घाईनं कोंबली. एक इकडे, एक तिकडे कुठेतरी पडलेले मोजे शोधले. गडबडीनं त्यात पाय घुसवले. इतक्यात 'टण्णदिशी' टोल पडला घड्याळात. स्कूलबस यायची वेळ झाली. तसा पॉलिश न केलेले बूट हातात घेऊनच तो बसस्टॉपकडं धावला. तोवर बस समोर येऊन थांबलीच ! कसाबसा तो बसमध्ये शिरला. बस सुरू झाली. जिथं जागा मिळेल तिथं बसून तो बूट घालू लागला. आईचा त्याला प्रचंड संताप आला होता. बूट घालता घालता मनाशीच चरफडत तो पुटपुटू लागला.

'अशी कशी ही आई ? जरासुद्धा मदत करत नाही ! म्हणे आता मी मोठा झालो. माझी कामं मी करायला हवीत. माझ्या वस्तू मी नीट व्यवस्थित ठेवायला हव्यात. नीटनेटकं राहायला हवं ! मला सांगा, सगळी कामं मी केल्यावर हिला काय काम दिवसभर ? शाळेमध्ये दिवसभर शिस्त सांभाळून, अभ्यास करून कंटाळा येत नाही का आम्हाला ? आता

शूजला पॉलिश नाही. अरेच्या ! कमरेला पट्टा पण बांधला नाही म्हणजे नक्कीच छड्या खाव्या लागणार ! वाईट, दुष्ट आहेत सगळे !' शेवटचं वाक्य जरा मोठ्यानंच बोलला तो. जवळच बसलेल्या वाहकानं विचारलं,

''काय रे ? कुणाला दुष्ट म्हणतोयस ?''

तसा बावचळून अमर म्हणाला, ''कोण मी ? मी नाही काही म्हणालो !''

''बरं बरं. ठीक आहे. चल उतर खाली, शाळा आली.'' वाहक म्हणाला.

अमर बसमधून खाली उतरला. त्याच्या अंदाजाप्रमाणे प्रार्थनेमंत्र्यानं त्याला चार छड्या मारल्या. जीव कळवळला अमरचा पण करणार काय ? प्रार्थना झाली. अमर वर्गात गेला; पण गृहपाठ पूर्ण केलेले नाहीत म्हणून शिक्षकांचं ओरडणं खावं लागलं. सगळा दिवसच वाईट गेला; पण शेवटचा तास मात्र मस्त मजेचा गेला! कारण... ? त्या तासाला जादूचे प्रयोग होते.

सगळी मुलं सभागृहात जमली. क्षणातच मस्त राजासारखा भरजरी पोषाख आणि तुर्रेदार फेटा घातलेला जादूगार रुबाबात आला. त्याच्या हातातली ती जादूची छडी कशी चमचमत होती. ती छडी फिरवून 'छूऽ मंतर' म्हणून त्यानं केवढ्या करामती करून दाखवल्या. रुमालाचा ससा झाला. दंडगोल डब्यातून कागदाच्या तुकड्यांची मिठाई झाली. एका रुमालातून दहा दहा रंगीबेरंगी रुमाल निघाले. हवेतून फुलांच्या माळा निघाल्या. एकदा तर पडद्यामागची मुलगीच गायब झाली ! रिकाम्या बॉक्समधून टॉफी, चॉकलेटचा ढीग धबधब्यासारखा पडला आणि हे सगळं झालं त्या जादूच्या छडीमुळं!

त्या जादूच्या छडीचं अमरला इतकं प्रचंड आकर्षण वाटलं की प्रयोग संपल्यावर सगळ्यांना बाजूला सारत जादूगाराकडं जावं आणि ती छडी मागून घ्यावी असं त्याला वाटलं; पण... दुष्ट मुलं त्याला जादूगारापर्यंत जाऊ द्यायला पाहिजेत ना ? सगळ्यांनी त्याला मागे मागेच ढकललं. जादूगार जसा आला तसा निघून गेला. अमर मात्र छडीच्या विचारातच गुंगून गेला. मित्रांनी त्याला जागं केलं.

''अरे अमर, चल की. घरी नाही का जायचं ? चल. बस लागली बघ !''

तसा अमर बसमध्ये बसला. घरी आला. आल्याआल्या बूट एकीकडे, मोजे एकीकडे फेकून दिले. दप्तर हॉलमध्येच टाकून दिले आणि ओरडला, ''आई ऽ, मला भूक लागली ऽ!''

''हं ऽ ! कपडे बदल, हातपाय धू आणि ये. तोवर मी दूध गरम करून देते.'' आई बोलली.

''मी नाही हातपाय धुणार ! मला आधी खायला दे !''

असं म्हणत अमर तसाच जेवणाच्या टेबलाजवळ येऊन खुर्चीवर धपकन् बसला.

आईनं कपाळावर हात मारला. म्हणाली, ''अमर, तू अलीकडं फारच

बेशिस्त, गबाळा, कामचुकार व्हायला लागला आहेस हं ! असं वागणं बरोबर नाही. एवढंच तुला मी सांगते.''

'तेवढंच कर ! सना न् कदा ओरडायचं, खेकसायचं, असंच कर. तस्सं करू नको. हे चांगलं, ते वाईट. हे कर, ते करू नको. असं बोलण्यापलीकडे दुसरं येतंय काय तुला ?' अमर तोंडातच पुटपुटला.

आई काही न बोलता दूध, शिरा टेबलावर ठेवून गेली. त्या दिवशी आईनं बाबांकडे त्याची तक्रार केली. बाबाही त्याला ओरडले. त्यामुळं रात्री न जेवताच तो रुसून झोपी गेला; पण त्याच्या मिटल्या डोळ्यांपुढं छडी दिसत होती. जादूची छडी हातात असती तर हवं ते आरामात खाता आलं असतं. मग कशाला आईबाबांचं ओरडून घ्यावं लागलं असतं ? मीच त्यांना जादूची छडी फिरवून गायब केलं असतं. असेच विचार करता करता त्याला झोप लागून गेली. आणि... ?

खरंच तो जादूगार जादूची छडी फिरवत रुबाबात आला आणि हसून म्हणाला – ''हाय फ्रेंड, कसा आहेस ? जादूची छडी हवी काय तुला ? ही घे; पण जपून हं ! जादूची छडी आहे ही ! वेडंवाकडं, चुकीचं वागलास की.... ? काय होईल ? तूच अनुभव घे !'' असं म्हणून छडी हवेत गोल फिरणारी जादूची छडी पकडू लागला; पण छडी कसली वस्ताद. ती उभी, आडवी, गोल, तिरकी, खाली, वर कशीही उड्या मारू लागली. अमरची तारांबळ उडू लागली. तोही तिला पकडायला वेड्यावाकड्या उड्या मारू लागला. तशी छडी माणसासारखी खदाखदा हसू लागली. हसता हसता नाचू लागली, गाऊ लागली.

'छडी रे छडी मी जादूची रे छडी ।
कोपऱ्यात बसते मारून दडी ।।
शोध तू मला, हाती घेईन उडी ।
सांगशील ते कराया राहीन खडी ।।'

आणि क्षणातच छडी कुठंतरी गायब झाली; पण अमरनं तिला हुडकून काढलंच. म्हणाला, ''छडी गं छडी दे मला जादूगाराची कुडी !''

छडी हसून म्हणाली, ''अरे वेड्या, कुडी शब्दाचा अर्थ माहीत आहे का तुला ? कुडी म्हणजे शरीर ! मी काही ते देऊ शकत नाही. जादूगाराचे कपडे हवे तर देईन घे !''


क्षणात अमरच जादूगार झाला. हवेत छडी फिरवून म्हणाला, ''मला छड्या देणाऱ्या प्रार्थनामंत्र्याला तू सपासप छड्या मार !'' छडी प्रार्थनामंत्र्याच्या पाठीवर सपासप पडू लागली.

प्रार्थनामंत्री रडू ओरडू लागला तसा अमर हसू लागला आणि फटाफट्

आज्ञा देऊ लागला. ''सारखी ओरडते, खेकसते आईला मांजरीण कर. सारखी धमकी देणाऱ्या, भीती घालणाऱ्या बाबांनाच भित्रा ससा कर, गृहपाठ लिहायला सांगणाऱ्या शिक्षकांना ताबडतोब शंभर गृहपाठ लिहायला सांग, मला त्रास देणाऱ्या मित्रांना माकड बनव!'' मांजरीण झालेली आई, ससा झालेले बाबा, माकडं झालेले मित्र, गृहपाठ लिहिणारे शिक्षक कसे दिसतील या कल्पनेने तो खदखदा हसू लागला; पण हे काय ? छडीनं त्याचं काहीच ऐकलं नव्हतं. उलट छडी धरलेला हात वरच लटकून राहिला. त्या हातातून छडी बाहेर उंच उडाली आणि अमरच्याच पाठीवर बरसू लागली. तसा तो रडू-ओरडू लागला. चिडून म्हणाला, ''छडी गं छडी ? जादूगारालाच मारतेस?''

तशी छडी जरबेनं म्हणाली, ''होय. जादूगारसुद्धा चुकीचं वागला तर त्याला मी अशीच शिक्षा करते!''

''अगं; पण मी कुठं चुकीचा वागलो ?'' अमरनं विचारलं.



''अमर, तू माझा उपयोग कोणत्याच चांगल्या गोष्टीसाठी केला नाहीस. अरे, तू अत्यंत आळशी, गबाळा, वेंधळा, बेशिस्त मुलगा आहेस. तुझे हे दोष दूर व्हावेत म्हणून आई रागावते. लोकांनी तुला नावं ठेवू नयेत, तुझी थट्टा करू नये म्हणून ती तुला पुन्हा पुन्हा सांगते. आईला दिवसभर काम नाही, तिनं तुझी कामं करावीत असं तुला वाटतं; पण एक दिवस लक्षपूर्वक बघ ती दिवसभर किती काम करते ते ! बाबा तर दिवसभर काम करून तुझ्यासाठीच तर पैसा कमावतात. त्या पैशाच्या मदतीनं तू चांगलं शिक्षण घ्यावंसं वाटतं त्यांना. कोणतंही काम वेळेवर करायची सवय व्हावी म्हणून शिक्षक ओरडतात. शाळेत, घरात, समाजात शिस्तीनं नीट-नेटकेपणानं वागावं म्हणून शिक्षा करतात. तो हेतू लक्षात न

घेता तू राग–रुसवा धरून त्यांनाच शिक्षा करायला निघालास ते योग्य आहे का ? विचार कर !

जरा आजूबाजुला बघ. आईनं छान आवरलेल्या खोलीची अवस्था तू कशी केली आहेस ? वह्या, पुस्तकं, दप्तर, कपडे, बेल्ट सगळं कसं विस्कटून पडलंय ! या पसाऱ्यातून हवी ती वस्तू कशी बरं मिळणार ?'' छडी बोलायची थांबली.

''खरंच माझं चुकलंच. उद्यापासून मी सगळ्या वस्तू जागच्या जागी ठेवीन. नीटनेटका राहीन. माझं काम वेळच्या वेळी स्वत: करीन. आई, बाबा, शिक्षक, मित्र यांना दोष न देता स्वत:ची कामं स्वत: करीन !''

अमरनं असं म्हणताच  अमरचा वर लटकलेला हात खाली आला. छडीनं अलगद त्याच्या गालाला स्पर्श केला. 'गुड बाय' म्हणाली. निघून गेली. तिला बाय् बाय् म्हणून निरोप देऊन अमरनं डोळे उघडले. समोर आई होती. मायेनं त्याला कुरवाळत होती. तिच्या गळ्यात पडून अमर म्हणाला, ''आई, चुकलं माझं. आजपासून मी नीटनेटका वागेन. माझी कामं मीच करीन.''

''शहाणं माझं बाळ ते.'' आई दाटल्या गळ्यानं म्हणाली; पण तो कशामुळे शहाणा झाला हे मात्र तिला कळलं नाही !

ती आपली आणि अमरची जम्माडी जम्मत कुणाला सांगायची नाही बरं का ! स्वप्नातली जादूची छडी विसरायची नाही हं !

✦✦



# जादूची बाहुली

– सरोज चौगुले

तिचं नाव चिन्मयी होतं; पण सगळे तिला चिन्नी म्हणत. चिन्नी खूप चांगली, हसरी मुलगी होती; पण अलीकडं ती खूप दु:खी झाली होती. कारण होतं तिच्या नव्या आईचं वागणं. ती घरी आली आणि मुश्किल झालं चिन्नीचं जगणं. ती सारखी चिन्नीला कामं सांगायची, रागवायची, ओरडायची. चिन्नीला खूप वाईट वाटायचं; पण... तिने ते कुणाला सांगायचं ? तिची आई देवाघरी गेली होती. तिच्या जागी ही नवी आई आली होती आणि आल्यापासून तिनं चिन्नीला छळायला सुरुवात केली होती. तिनं बाबांना नव्या आईची तक्रार सांगितली तर म्हणाले,

''हे बघ, मला तिची काहीसुद्धा तक्रार सांगू नको. ती सांगेल ते ऐक, कामचुकारपणा करू नको !''

बिच्चारी चिन्नी हिरमुसली झाली. आजीकडं दाद मागायला गेली. आजी तर तिच्यावर खेकसली. म्हणाली, ''पोरीच्या जातीला चुगल्या करणं शोभत नाही. चल जा. कामाला लाग.''

''अगं; पण ती सारखी तिच्या त्या रडक्या मुलाचे लाड करते. मला सारखी कामं सांगते, रागावते, चांगलं खायला पण देत नाही.'' चिन्नीनं आपलं घोडं दामटलंच.

तशी आजी म्हणाली, ''तुला पोरीच्या जातीला गं कशाला चांगलं चुंगलं खायला पाहिजे ? तो रडका मुलगा म्हणतेस तो तुझा भाऊ आहे ! कुलदीपक आहे. वंशाचा दिवा आहे. त्याचे लाड करायलाच हवेत. नाहीतर तो धष्टपुष्ट कसा होईल ? जा पुढ्यात पडेल ते खायचं आणि सांगितलेलं काम करायचं. पुन्हा माझं डोकं खायला येऊ नको !''

आजी आणि बाबा नव्या आईच्याच बाजूनं बोलले. मग काय? नव्या आईला चिन्नीचा छळ करायला रान मोकळे झाले. चिन्नीला शिळ्या भाकरीचे तुकडे व मिरचीचा ठेचा मिळू लागला. डोळ्यातल्या पाण्याबरोबरच ती ते तुकडे कशीबशी खायची.

घरातली पक्वान्नं वासामुळं तिला वाकुल्या दाखवायची. तिची झोपायची जागा पण सोप्यातून ओसरीत, ओसरीतून गोठ्यात गेली. एक फाटकी वाकळ पांघरायला आणि गोणपाट अंथरायला मिळाले. काम तर तिला झेपणार नाही इतकं होतं; पण वर मनाला लागेल असं बोलणं. एक दिवस नव्या आईनं तिला उपाशीच ठेवलं कारण तिनं गाईच्या वासराला गाईचं दूध पिऊ दिलं होतं. त्यामुळं गाईनं दूध दिलं नाही. बाळाला ताजं दूध प्यायला मिळालं नाही. शिक्षा म्हणून नव्या आईनं चिन्नीला उपाशी ठेवलं. चिन्नीला काम करून कडकडून भूक लागली होती. उपाशीपोटी झोप येईना. तिला आई, बाबा, आजी साऱ्यांचाच राग आला. रागारागानं ती उठली आणि घर सोडून निघाली.

रागाच्या भरात ती घरापासून, गावापासून खूप लांब आली. कशाला तरी ठेचाळल्यामुळे 'आई आई गंऽ मेले ऽ' असं म्हणत दचकून ती थांबली. बाजूला पाहिलं तर मिट्ट काळोख, दाट जंगल, रातकिड्यांची किरकिर.... हे सगळं भयंकर बघून चिन्नी घाबरली. दहा–अकरा वर्षांची लहान पोर ! जमिनीवरच फत्‌कन्‌ बसून रडू लागली. ठेच लागून अंगठा फुटला होता. त्या वेदनेनं कळवळली. इतक्यात मोठा चमत्कार झाला ! कुणीतरी मायेनं तिला साद घालत आहे, तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवत आहे असं तिला वाटलं. कुणीतरी नव्हे, साक्षात्‌ तिची आईच जवळ उभी आहे असा तिला भास झाला. ''आई'' असं म्हणून तिनं वळून पाहिलं; पण तिथं कुणीच नव्हतं.



शब्द मात्र ऐकू आले, ''चिन्नू, माझे पोरी, रडू नकोस, घाबरू नकोस. मी स्वत: तुझे दु:ख दूर करू शकत नाही; पण तुला मी एक बाहुली देते. ही जादूची बोलकी बाहुली तुझ्याशी बोलेल. तुझं दु:ख दूर करेल. ती तुझी मैत्रीण होईल. तुला मार्गदर्शन करेल. मात्र ती कोणाला दिसू देऊ नको. आता घरी जा. आजपासून तुझं दु:ख दूर झालं असं समज. पुन्हा अविचारानं रागाच्या भरात अशी अवेळी घराबाहेर पडू नकोस. देव तुझं भलं करील.'' शब्द थांबले आणि चिन्नूच्या मांडीवर एक छानदार बाहुली टपकन्‌ पडली.

''बाहुली माझी लाडकी बाहुली'' असं म्हणून तिनं बाहुलीला छातीशी कवटाळलं. तसा तिच्यातून चमकदार सात रंगी प्रकाश बाहेर पडला. बाहुली कानात कुजबुजली –

''चिनुताई, उठा आता उठा ।
वाघोबा करतील चट्टामट्टा ।
तेव्हा घराकडे पळत सुटा ।
उजेड माझा दाखवील वाटा ।।''

''बापरे ! खरंच की. चल पटकन् घरी जाऊया; पण मला घर कुठं आहे ! मी तर गोठ्यात राहते!'' चिन्नू म्हणाली.

''हं ! जिथं कुठं राहतेस तिथं आधी जाऊया चल.'' बाहुली म्हणाली.

''बरं बरं.'' असं म्हणनू चिन्नू चालू लागली. पण...पण... हे काय ? चिन्नू एकदम हवेत उचलली गेली. पक्ष्यासारखी उडू लागली. केवढं छान वाटलं तिला. क्षणातच ती घरात येऊन पोहोचली. गोठ्यात गेल्या गेल्या तिच्या पुढ्यात धारीच्या दुधानं भरलेला पेला अधांतरी तरंगत आला. तिनं तो पिऊन टाकला. भुकेजलेली चिन्नी संतुष्ट झाली. तिचे डोळे पेंगाळू लागले. तिनं गोणपाट पसरलं आणि काय आश्चर्य ! मऊ गादीसारखं झालं. फाटकी वाकळ उबदार रजईसारखी झाली. चिन्नी गाढ झोपी गेली. बाहुलीनं तिला उठवलं. चक्क उजाडलं होतं. तिनं धडपडून गोठा स्वच्छ करण्यासाठी खराटा हातात घेतला. तो काय ? गोठा स्वच्छ झाला होता. गायीम्हशींपुढं वैरण घातली होती. ही सगळी त्या बाहुलीची करामत होती. तिनं बाहुलीकडं कृतज्ञतेनं पाहिलं आणि गोठ्याच्या छपरात तिला लपवून ठेवली.

आणि मग रोजच रात्री चिन्नी बाहुलीशी बोलू लागली. बाहुली 'छूऽ मंतर' करून तिचं दु:ख दूर करू लागली. चिन्नीच्या ताटातली शिळी भाकर गाईच्या पुढ्यात जाऊ लागली. गाईचं गोड दूध चिन्नीला मिळू लागलं. गुरं घेऊन रानात गेल्यावर बाहुलीच्या जादूनं तिला गोड गोड फळं मिळू लागली. त्यामुळं चिन्नी धष्ट–पुष्ट होऊ लागली. बाहुलीच्या मायेमुळं आनंदी दिसू लागली. तसा नव्या आईच्या मनात संशय आला. उपाशी ठेवूनसुद्धा ही इतकी धष्ट–पुष्ट कशी ? मरणाचं काम लावूनसुद्धा इतकी आनंदी कशी ? आपल्या संशयाचा छडा लावण्यासाठी नवी आई चिन्नीला रागवायला, मारायला धावली; पण बाहुलीनं चिन्नीला सावध केलं. ती चटकन् बाजूला सरकली. तशी नवी आई तोंडावर आपटली अन् तिचे दातच तुटले. तोंड सुजून मारुतीसारखे झाले. चिन्नीवर ओरडायला तोंडच हलविता येईना तिला. तिचा अवतार बघून चिन्नीला हसू येत होतं; पण हसू आवरून तिनं